# 'वॅनबरी'ची नवीन औषधी बाजारात

## कॅल्शिअम ओरोटेटच्या सीडेन्स गोळ्या

वॅनबरी लिमिटेड स्थानिक बाजारपेठेत वेगाने वाढणाऱ्या औषध कंपन्यांपैकी एका कंपनीने ऑस्ट्रीयोस्पायरोसिस आणि गायनॅकोलॉजीसंबंधित कॅल्शियम कमतरता असणाऱ्या बाजारपेठेत प्रवेश केल्याची घोषणा केली. त्यांनी याकरता आता सीडेन्स या कॅल्शियम ओरोटेट या मिनरल ट्रान्सपोर्टरच्या गोळ्या बाजारात आणल्या आहेत.

कॅल्शियम सप्लिमेंटकरता कॅल्शियम ओरोटेटचा वापर करणारी वॅनबरी ही देशातील पहिली कंपनी असून सध्या बाजारात उपलब्ध असणारे कॅल्शियम ब्रॅन्डस् हे बेस म्हणून कॅल्शियम कार्बोनेटचा वापर करतात. जागतिक स्तरावरील अभ्यासाने असे सिद्ध झाले आहे की कॅल्शियम ओरोटेट (सीडेन्स) हे एकमेव कॅल्शियम आहे. जे थेट हाडावर परिणाम करून त्यांतील कॅल्शियमचा साठा भरून काढते आणि हाडे मजबूत होतील.

सीडेन्स हे उत्पादन १०० टक्के प्रिस्क्रिप्शनवर उपलब्ध होणार असून ते मुख्यत्वेकरून ऑस्ट्रीयोस्पायरोसिस, कंबरदुखी, रजोनिवृत्त महिला तसेच गरोदर स्त्रिया यांच्यासाठी विशेष रूपाने तयार करण्यात आले आहे.